मा.न्यायालयाकरिता

N.C.R.B (एन.सी.आर.बी)
I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

पोलीस इन्स्पेक्टर पोलीस ठाणे डहाणू (पालघर)

# FIRST INFORMATION REPORT

**(Under Section 154 Cr.P.C.)**
प्रथम खबर अहवाल
**(कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता)**

**1. District (जिल्हा):** पालघर **P.S.(ठाणे):** डहाणु

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0045 **Year (वर्ष):** 2024

**Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 27/02/2024 11:06

**2.**

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |
| 2 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7A |

**3. (a) Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** सोमवार **Date From (दिनांक पासून):** 26/02/2024
**Time Period (कालावधी):** पहर 6 **Date To ( दिनांक पर्यंत):** 26/02/2024
**Time From (वेळेपासून):** 18:06 बजे
**Time To (वेळेपर्यंत):** 18:06 बजे

**(b) Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**

**Date (दिनांक ):** 27/02/2024 **Time (वेळ):** 10:25 बजे

**(c) General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**

**Entry No. (नोंद क्र.):** 016

**Date & Time (दिनांक आणि वेळ):** 27/02/2024 10:25 बजे

**4. Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

**5. Place of Occurrence (घटनास्थळ):**

**1.(a) Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**
पश्चिम, 2 किमी **Beat No. (बिट क्र.):**

**(b) Address (पत्ता):** उप अधिक्षक भुमी अभिलेख, कार्यालय डहाणू,ता डहाणू, जि पालघर

**(c) In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**

**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**

**District(State) (जिल्हा(राज्य)):**

6. **Complainant / Informant** (तक्रारदार/माहिती देणारा):

(a) **Name** (नाव): प्रणित धावजी उंबरसाडा

(b) **Father's Name** (वडील चे नाव) : धावजी उंबरसाडा

(c) **Date/Year of Birth** (जन्म तारीख/वर्ष): 1988

(d) **Nationality** (राष्ट्रीयत्व): भारत

(e) **UID No.** (यु.आय.डी. क्र.):

(f) **Passport No.**(पारपत्र क्र.):

**Date of Issue** (दिल्याची तारीख):

**Place of Issue** (दिल्याचे ठिकाण):

(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN)** ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address** (पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | 8830964286,मु पो कासा, विठ्ठलनगर,महाराष्ट्र बंकेच्या समोर,ता डहाणू, जि पालघर,डहाणु ,पालघर,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | 8830964286,मु पो कासा, विठ्ठलनगर,महाराष्ट्र बंकेच्या समोर, डहाणू, जि पालघर,डहाणु ,पालघर,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation** (व्यवसाय):

(j) **Phone number** (फोन नं.):

**Mobile** (मोबाइल नं.):

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars** (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | गोरख शंकर घुमरे | | | 1. डी/1, ओम दत्त कोऑहा, सोसायटी, पारनाका, डहाणू गाव,ताडहाणू, जिपालघर , डहाणु ,पालघर,महाराष्ट्र,भारत |
| 2 | प्रफुल्ल लक्ष्मण संखे | | | 1. ई/202, मोहक हाऊस बिल्डींग ,मनवेलपाडा रोड, मोरया नगर, विरार पूर्व,तावसई, जिपालघर, विरार,पालघर,महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant** (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):

9. **Particulars of properties of interest** (संबंधीत मालमत्तेचा तपशील):

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|

10 **Total value of property (In Rs/-)**
(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):

11. **Inquest Report / U.D. case No., if any**
(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

12. **First Information contents** (प्रथम खबर हकीकत ):

फिर्याद दिनांक 27/02/2024.

मी प्रणित धावजी उंबरसाडा, वय 36 वर्षे, धंदा-शेती, रा. मु.पो.कासा, विठ्ठलनगर, महाराष्ट्र बॅकेच्या समोर, ता. डहाणू, जि.पालघर, मोबाईल नं. 8830964286 असा असून समक्ष फिर्याद लिहुन देतो की,

मी शेतकरी असून वरील पत्यावर कुटूंबासह राहतो. माझे गावापासून दहा कि.मी. अंतरावर मु.पो.आसवे-पाटीलपाडा, आशागड, ता.डहाणू येथे माझे मामा, मामे भाऊ राहतात. माझा एक मामे भाऊ संदीप रामा चौधरी याने मला चार-पाच महिन्यापूर्वी त्यांची मौजे आसवे-आशागड हद्दीतील त्यांच्या इतर नातेवाईकांमध्ये असलेली सामाईक शेतजमीनीची मोजणी करायची असून त्यासाठी भूमी अभिलेख कार्यालय डहाणू येथे अर्ज करायचा आहे त्यासाठी त्याने भूमी अभिलेख कार्यालयातून मोजणीसाठीचा कोरा अर्ज आणला असून तो भरून दयायचा आहे असे सांगीतले परंतु त्याला लिहिता वाचता येत नसून फक्त सही करता येत असल्याने त्यानी मला अर्ज भरुन भूमी अभिलेख कार्यालय डहाणू येथे देण्यासाठी मदत कर म्हणून सांगीतले होते. त्याप्रमाणे मी 4-5 ऑक्टोबर 2023 रोजी संदीप कडे जावून त्याने जमीन मोजणीसाठीचा आणलेला कोरा अर्ज बघून त्यावरील सर्व रकाने भरले, सातबाराच्या उता-या प्रमाणे जमीनीच्या सहधारकांची नावे व त्यांच्या सहया-अंगठे घेवून तो जमीन मोजणीसाठीचा अर्ज दि. 06/10/2023 रोजी मी व संदीप असे मिळून जावून उप अधीक्षक, भूमी अभिलेख कार्यालय, डहाणू येथे देवून त्याची पोहोच घेतली. त्याच दिवशी संदीप आणि त्याचे नातेवाईक यांचेमधील सामाईक असलेल्या शेतजमीनीच्या मोजणीच्या दिलेल्या अर्जाचा मोजणी नकाशा मिळेपर्यत पाठपुरावा करण्यासाठी त्याने मला अधिकारपत्र दिलेले आहे.

अर्ज दाखल केल्यानंतर आजपर्यंत मी पाच ते सहा वेळा भूमी अभिलेख डहाणू कार्यालयात जावून मोजणी अर्जाचा पाठपुरावा केला. दिनांक 20 डिसेंबर 2023 रोजी मी भूमी अभिलेख कार्यालयात गेलो असता तेथील छानणी लिपीक श्री.पाटील यांनी मला मोजणी अर्जाबाबत एसबीआय बॅकेत जावून 4,500/-रूपयाचे चलन घेवून येण्यास सांगीतले. त्याप्रमाणे मी त्याच दिवशी एसबीआय बॅकेत जावून 4,500/-रूपयाचे चलन घेवून येवून छाननी लिपीक श्री.पाटिल यांचेकडे जमा केले असता त्यांनी पाच दिवसात तुम्हाला मोजणीची तारीख कळवतो असे सांगीतले. त्याप्रमाणे पाच-सहा दिवसानंतर मी भूमी अभिलेख कार्यालय डहाणू येथे गेलो असता श्री.पाटिल यांनी 25 जानेवारी 2024 ही तुमची मोजणीची तारीख असून त्यांचे कार्यालयातील श्री.घुमरे हे मोजणीकरीता येतील असे सांगून त्याचवेळी श्री.घुमरे यांची ओळख करून दिली. त्यावेळी मी माझा मोबाईल नंबर श्री.घुमरे यांना देवून त्यांचा देखील मोबाईल नंबर घेतला.

त्याप्रमाणे श्री.घुमरे यांनी 25 जानेवारी 2024 रोजी जमीनीची मोजणी करून दिली त्यावेळी मी, संदीप त्यांचे नातेवाईक व गावातील पंच हजर होते. त्यावेळी श्री.घुमरे यांनी मोजणीची क-प्रत एक महिन्याने भेटेल असे सांगून ऑफीसला येण्यास सांगीतले.

दिनांक 22 फेब्रुवारी 2024 रोजी श्री.घुमरे यांनी मला फोन करून मोजणीची क-प्रत घेण्यासाठी उदया शुक्रवार दिनांक 23 फेब्रुवारी 2024 रोजी भूमी अभिलेख कार्यालयात ये असे सांगीतले. त्याप्रमाणे मी 23 फेब्रुवारी 2024 रोजी कार्यालयात जावून श्री.घुमरे यांना भेटलो असता त्यांनी आज संखे साहेब नाहीत त्यामुळे क-प्रत तयार नाही परंतु क-प्रत मिळण्याकरीता सगळे मिळून 30,000/-रूपये दयावे लागतील असे सांगून रविवारी 25 फेब्रुवारी 2024 रोजी फोन करून कधी यायचे ते सांगतो असे बोलले. त्यानंतर श्री.घुमरे यांनी 25 फेब्रूवारी 2024 रोजी सकाळी 09.26 वाजता मला कॉल केला परंतु मी मोटार सायकलवर असल्याने मी तो घेवू षकलो नाही. त्यानंतर मी लगेच 09.27 ते 10.20 वाजता चे दरम्यान चार वेळा फोनवरून त्यांचेशी बोललो. त्यावेळी त्यांनी मोजणीची

क-प्रत मिळण्याकरीता त्यांना त्यांचे साहेब संखे आणि कार्यालयातील इतर कर्मचायांना असे मिळून 30,000/-रूपये दयावे लागतील असे सांगून उदया सोमवार दिनांक 26 फेब्रूवारी रोजी दुपारी क-प्रत घ्यायला ये व सोबत पैसे घेवून ये असे सांगीतले.

मी श्री.घुमरे साहेब यांना 30,000/-रूपये लाचेची रक्कम दिल्याशिवाय ते मला मोजणीची क-प्रत देणार नाहीत. परंतु मला लोकसेवक गोरख घुमरे साहेब यांना तसेच त्यांचे वरिष्ठांना कोणत्याही प्रकारची लाचेची रक्कम देण्याची इच्छा नसल्याने मी दिनांक 26/02/2024 रोजी अँन्टी करप्पन ब्युरो, पालघर कार्यालयामध्ये हजर राहून माझे हस्ताक्षरामध्ये पोलीस उप अधीक्षक श्री.दयानंद गावडे यांचेकडे लेखी तक्रार दिली. त्यावेळी पोलीस उप अधीक्षक श्री.गावडे यांनी माझे सदर तक्रारीचे अनुशंगाने दोन षासकीय पंच साक्षीदार मागवून घेवून माझे तक्रारीवर पुढील कारवाई पोलीस निरीक्षक श्री.शिरीष चौधरी , नेम.अँन्टी करप्पन ब्युरो, पालघर हे करणार असल्याचे सांगीतले. त्यानंतर मी दिलेल्या तक्रारीच्या अनुशंगाने अँन्टी करप्पन ब्युरो, पालघर कार्यालयाचे पोलीस निरीक्षक श्री.शिरीष चौधरी यांनी लोकसेवक घुमरे हे लाचेची मागणी करतात अगर कसे? याची दोन पंचासमक्ष दिनांक 26/02/2024 रोजीच पडताळणी करण्यात येणार असल्याचे सांगून माझ्याशी पंचांची व पडताळणी पथकाची ओळख करून दिली. तसेच करण्यात येणा-या पडताळणी कारवाई बाबत थोडक्यात माहीती दिली.

त्यानंतर मी पोलीस निरीक्षक श्री.चौधरी यांना सांगीतले की, लोकसेवक घुमरे यांना भेटण्यास जाण्यापुर्वी त्यांना फोन करून ते ऑफीसमध्ये आहेत का? याची खात्री करणे गरजेचे आहे. त्याप्रमाणे मी माझा मोबाईल नं. 8830964286 वरून लोकसेवक घुमरे यांचा मोबाईल नं. 9834556609 वर व्हॉटस् अँप द्वारे फोन करून फोनचा लाउडस्पीकर चालू करून बोलणी केली. त्यावेळी मी त्यांना माझे कामाचे अनुशंगाने विचारणा केली असता त्यांनी मला त्यांचे ऑफीसला येण्यास सांगीतले. सदरचे फोनवरील संभाषण दोन पंचासमक्ष व्हॉईस रेकॉर्डर मध्ये ध्वनिमुद्रीत करण्यात आलेले आहे. त्यानंतर पोनि/श्री.चौधरी यांनी सांगीतले की, माझे तक्रारीचे अनुशंगाने पडताळणी कारवाई ही लोकसेवक घुमरे यांचे भूमी अभिलेख कार्यालय, डहाणू येथे पाठवून पंचसाक्षीदार यांचे समक्ष करण्यात येणार आहे.

त्यानंतर पोलीस निरीक्षक श्री.शिरीष चौधरी यांनी सांगीतले की, पुढील कारवाई करीता शासकीय वाहन एम.एच.48, सी.के. 6525 चा वापर करण्यात येणार आहे. त्यानंतर पोनि/श्री.शिरीष चौधरी यांचे सुचनेप्रमाणे पथकातील अंमलदार यांनी पडताळणी तसेच सापळा कारवाई करीता लागणारे साहित्य शासकीय वाहनामध्ये ठेवून दिले. त्यानंतर मी पोनि/श्री.शिरीष चौधरी यांना पंचसाक्षीदार यांचे समक्ष सांगीतले की, अँन्टी करप्पन ब्युरो, पालघर येथे येण्याकरीता मी माझे कडील मोटार सायकल क्र.एमएच 48/बीके 7015 ही आणलेली आहे. त्यावेळी पोनि/श्री. शिरीष चौधरी यांनी मला शासकीय वाहनाचे पाठोपाठ माझेकडील मोटार सायकल वरून डहाणू येथे येण्याबाबत सुचना दिल्या. त्याप्रमाणे मी शासकीय वाहनाचे पाठोपाठ उप जिल्हा रूग्णालय, डहाणू येथे पोहचलो. त्यानंतर पोनि/श्री.शिरीष चौधरी यांनी पडताळणीचे अनुशंगाने सुचना दिल्या.

त्यानंतर माझे अंगावर व्हॉईस रेकॉर्डर लावून पंच नं. 1 यांच्यासह मी माझेकडील दुचाकीने उप अधीक्षक, भूमि अभिलेख कार्यालय डहाणू येथे गेलो. त्यावेळी लोकसेवक घुमरे हे त्यांचे काम करत बसले होते. त्यावेळी त्यांनी माझेकडे पाहून हाताचा इशारा करून मला कार्यालयाच्या बाहेर थांबण्यास सांगीतले. त्याप्रमाणे मी व पंच असे कार्यालयाचे बाहेर जावून कार्यालयाच्या प्रवेषद्वाराजवळ थांबून राहिलो. त्यावेळी लगेचच आमचे पाठोपाठ लोकसेवक घुमरे हे आमचे जवळ आले. त्यावेळी मी लोकसेवक घुमरे यांचेषी कामाचे अनुशंगाने बोलणी झालेनंतर लोकसेवक घुमरे हे मला ''तुम्हाला एक सांगतो, जो भी आहे आपला व्यवहार झाला ना आपल्या दोघांमध्ये ठेवायचा, विशय संपला, मला नाय माहिती ठिक हे मी दिले भी नाही, घेतले भी नाही ठिक हे, समजल ना.'' असे बोलले . त्यावर मी त्यांना ''फक्त माझ म्हणण काय आहे साहेब, हे पुढ डवला साहेब सांगायचे, संखे साहेब परत माझ्याकडे मागायचे'' असे बोललो. त्यावेळी लोकसेवक घुमरे हे मला ''नाही नाही नाही ते नका टेंशन घेवू, जे भी आपल होईल ना, ठिक हे, तुम्ही मला दोन दिवसांनी पण आणून दिले ना..ते म्हणणार भी नाही, बोलणार भी नाही'' असे बोलले. त्यावेळी मी त्यांना ''आता संखे साहेबांषी तस भेटायला लागेल मला...नाय म्हणजे ते तुम्हीच करा'' असे बोललो असता ते मला ''संखे साहेबाला काय भेटायची गरज नाही, आपण भेटू, मोजणी केली, तुम्हाला दाखवलं. तुमच क्षेत्र किती कमी जास्त होतय ते, तुम्हाला दाखवून देईल मी'' असे बोलून त्यांनी मला त्यांचे उजव्या हाताने अंगठयाजवळील बोट एकमेकावर घासून पैशाबाबत विचारणा केली. त्यावेळी मी त्यांना ''थोडस पैषाच काही, कमी जास्त झालं'' असे विचारले असता ते मला ''तुम्ही सांगा ना'' असे बोलले. त्यावेळी मी त्यांना ''नाही, मी तुमच्यामध्ये हे नाय करणार अस'' बोललो असता ते मला ''सगळयांना आस असते. साहेबांना वाटतं मला काही दयायला पाहिजे. एक दोन वेळा असे हे विशय झाले होते. मग त्यांना काही दिले तर मग फटाफट आपल काम पण होत.'' ''तुम्ही किती देणार भो अस'' असे बोलले. त्यावेळी मी त्यांना ''तुम्ही सांगा ना?'' तरी किती सर अंदाजे किती दयायला लागतील'' असे

विचारले असता ते मला ''साहेबांना दहा दयावे लागतील, डवला साहेबांना पाच आणि ते पाटीलला पाच, तांबोळेला पाच, आणखी राहतय कोण'' असे बोलले. त्यानंतर मी त्यांना संखे साहेबांना किती असे विचारले असता ते ''संखे साहेबांना त्यांना दहा'' असे बोलले. त्यानंतर मी त्यांना एकूण किती करू असे विचारले असता ते ''पंचवीस झाले'' असे बोलले. त्यानंतर मी त्यांना तुम्ही किती सांगीतले त्या दिवशी असे विचारले असता ते मला ''तीस'' असे बोलले. त्यानंतर मी त्यांना वीस मिनीटात जावून येतो असे बोलून मी व पंच नं.01 असे माझेकडील दुचाकीने शासकीय वाहन थांबलेल्या ठिकाणी परत आलो.
त्यानंतर पोलीस निरीक्षक श्री.षिरीश चैधरी यांनी सदरच्या भेटीदरम्यान व्हॉईस रेकॉर्डर मध्ये ध्वनिमुद्रीत झालेले संभाषण दोन्ही पंचांसमक्ष ऐकले असता, त्यामध्ये लोकसेवक घुमरे यांनी स्वतः करीता 5000/-रूपये तसेच त्यांचे कार्यालयातील इतर अधिकारी व कर्मचारी यांचेकरीता 25000/-रूपये लाचेची मागणी केल्याचे निष्पन्न झाले. त्यानंतर पोलीस निरीक्षक श्री.शिरीष चौधरी यांनी लागलीच सापळा पुर्व कार्यवाही पुर्ण करण्याचा निर्णय घेतला व मी दिलेल्या 500/- रू दराच्या 60 नोटा असे एकुण 30,000/- रू रक्कमेवर शासकीय वाहनामध्ये सापळापुर्व पंचनाम्याची कार्यवाही पुर्ण केली. व आंथ्रासीन पावडर लावलेली रक्कम माझे पॅन्टचे पुढील बाजूचे उजव्या खिशामध्ये ठेवली. त्यावेळी पोनि/श्री.चौधरी यांनी मला लोकसेवक घुमरे यांनी लाचेची रक्कम स्विकारल्या नंतर माझे डोक्यावरून वारंवार हात फिरवून लाचेची रक्कम स्विकारल्याचा इशारा करण्यास सांगीतले.
त्यानंतर माझे अंगावर व्हॉईस रेकॉर्डर लावून पंच नं. 01 असे माझेकडील दुचाकीने पारनाका येथील लक्ष्मी विलास हॉटेलजवळ गेलो. त्यावेळी सापळा पथक माझे पाठोपाठ येवून आजूबाजूचे परीसरात माझेवर लक्ष ठेवून थांबून राहिले. त्यावेळी मी माझे मोबाईलवरून लोकसेवक घुमरे यांना फोन करून मोबाईलचा स्पिकर ऑन केला. त्यावेळी लोकसेवक घुमरे यांनी मला उप अधीक्षक, भूमि अभिलेख कार्यालय डहाणू येथे येण्यास सांगीतले. सदरचे संभाषण पंच नं.1 यांनी ऐकले असता त्यांनी पोलिस निरीक्षक श्री.शिरीष चौधरी यांना लोकसेवक घुमरे यांनी उप अधीक्षक, भूमि अभिलेख कार्यालय डहाणू येथे भेटण्यास बोलविले असल्याचे सांगीतले. त्याप्रमाणे पोलीस निरीक्षक श्री.शिरीष चौधरी यांनी दिलेल्या सुचनेप्रमाणे सापळा पथक पायी चालत जावून उप अधीक्षक, भूमि अभिलेख कार्यालय डहाणू कार्यालयाचे बाजूचे परीसरात कोणास संशय येणार नाही अशा रितीने थांबून राहिले. त्यांनतर मी व पंच नं.1 असे माझे दुचाकीने उप अधीक्षक, भूमि अभिलेख डहाणू कार्यालय जावून लोकसेवक घुमरे यांचे जवळ गेलो असता लोकसेवक घुमरे यांनी हाताचा इशारा करून मला बाहेर जाण्यास सांगीतले. त्याप्रमाणे मी कार्यालयाचे बाहेर जावून प्रवेषद्वारा जवळ थांबून रा

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** (केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:** (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):

DATTATRAY BAJIRAO KINDRE(I (Inspector)) / PI **or** (किंवा)

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव):

**Rank** (पद): **No.**(क्र.):

**to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

राहिलो असता आमचे पाठोपाठ लोकसेवक घुमरे हे बाहेर आले. त्यावेळी मी लोकसेवक घुमरे यांना ''सर एकदा संखे सरांना भेटू..तुम्ही सांगा'' असे विचारले असता ते मला ''हां भेटून घ्या..भेटायला काय प्रॉब्लेम आहे'' असे बोलले. त्यावेळी मी त्यांना तुम्ही पण या जोडीला असे बोललो असता ते मला लोकसेवक संखे, उप अधीक्षक यांचे केबिनमध्ये घेवून गेले. त्यावेळी पंच नं.1 हे लोकसेवक संखे यांचे केबिनच्या समोर दरवाजाजवळ आमचेवर लक्ष देवून उभे होते.त्यावेळी मी लोकसेवक संखे, उप अधीक्षक यांना सर किती दिवसात संपेल प्रकरण असे विचारले असता त्यांनी मला उजव्या हाताचे बोटाचे अंगठयाजवळील बोट घासून पैशाचा इशारा करून ''प्रकरण तुम्ही सांगीतल त्यावेळवर आहेना मग'' असे बोलले. त्यानंतर मी त्यांना ''थोड जरा लवकर भेटेल तर बर होईल अस'' असे सांगीतले असता ते मला ''त्याच्यावर नुसते भेटते ना, तुम्हाला खर्च करायचा असतो'' असे बोलले. त्यानंतर पुन्हा मी लोकसेवक संखे यांचेशी कामाचे अनुषंगाने चर्चा करून त्यांना ''सर तरी किती दिवसानंतर देता येईल'' असे विचारले असता ते मला पुन्हा उजव्या हाताचे बोटाचे अंगठयाजवळील बोट घासून पैशाचा इशारा करून ''ते काय करणार तुम्ही'' असे विचारले. त्यावेळी मी त्यांना मला घुमरे साहेबांनी दहा सांगतीले आहे असे बोललो असता ते मला ''पंचवीस तर तुझ्यावर होतील, पंचवीस लागतील तु देशील तर करतो, नायतर ते तक्रारीमध्ये टाकून देतो दुनियाभरच्या तक्रारी आहेत त्याच्यात'' असे बोलले. त्यावेळी मी त्यांना काय कमी नाय होणार असे विचारले असता ते मला ''आरे त्याच काय ते भाजीपाला आहे काय, मी तुला कमी सांगीतले, जास्त वाढवले असते तर यांचे'' असे बोलले. त्यावर मी त्यांना आता दहा देवून जावू सर असे बोललो असता ते मला एकदाच दयायचे सगळे, एकदाच दयायचे घेवून यायच असे बोलले. त्यावेळी मी त्यांना तुमच्याकडे देवू का त्यांचेकडे सर असे बोललो असता ते मला आणलेत का तु असे विचारले. त्यावेळी मी त्यांना हो असे बोललो असता ते मला ''दहा नको देवू पंचवीस असेल तरच दे'' असे बोलले.

त्यावेळी मी माझे पॅन्टच्या पुढील बाजुच्या उजव्या खिशातून माझे उजव्या हाताने पैसे काढून पैसे मोजत असताना ते मला बाहेर जा बाहेर'' असे बोलले. त्यावेळी मी सदर लाचेच्या रक्कमेतील पाच हजार रूपये मोजून डाव्या हातात ठेवून उर्वरीत 25,000/-रूपये रक्कम माझे उजव्या हाताने लोकसेवक संखे यांचे समोर धरली असता त्यांनी ती त्यांचे उजव्या हाताने स्विकारून ते बसत असलेल्या टेबलाचे डाव्या खणामध्ये ठेवून दिली. त्यानंतर मी उर्वरीत 5000/-रूपये घेवून केबिनमधून बाहेर आलो असता लोकसेवक घुमरे हे मला कार्यालयाचे प्रवेषद्वाराजवळ भेटले. त्यावेळी मी लोकसेवक घुमरे यांना ''सर तुम्ही सांगीतले प्रमाणे तीस आणलेले, त्यांनी पंचवीस वर डिल केली. असे बोललो असता लोकसेवक घुमरे हे मला आरे यार काय माणूस आहे तू...काय येडा माणूस आहे तुला काय बोललो होतो मी यार येडा पणा केला असे बोलून त्यांनी देखील त्यांचा उजवा हात पुढे केला असता मी त्यांना माझेकडील असलेली उर्वरीत 5000/-रूपये रक्कम माझे उजव्या हाताने त्यांचेकडे दिली असता त्यांनी ती स्विकारून ती त्यांचे नेसूस पॅन्टच्या पुढील बाजूच्या उजव्या खिशामध्ये ठेवून दिली. त्यानंतर मी लाचेची रक्कम स्विकारल्याचा पुर्वनियोजीत इशारा केला. त्यावेळी सापळा पथकातील अधिकारी तसेच अंमलदार यांनी दोन्ही लोकसेवक यांना ताब्यात घेतले. तसा सविस्तर पडताळणी, सापळापूर्व व सापळा पंचनामा करण्यात आलेला आहे.

तरी दिनांक 26/02/2024 रोजी लोकसेवक गोरख शंकर घुमरे यांनी माझे मामे भावाच्या मालकीच्या जमीनीची मोजणी हद्द दाखवून मोजणी नकाशा तयार करून देण्यासाठी स्वतःकरीता 5000/-रूपये तसेच त्यांचे कार्यालयातील इतर अधिकारी व कर्मचारी यांचेकरीता 25000/-रूपये लाचेची मागणी केली. तसेच सापळा कारवाई दरम्यान 1)लोकसेवक गोरख शंकर घुमरे, वय 39 वर्शे, पद-अभिलेखपाल (वर्ग-3), उप अधीक्षक, भूमी अभिलेख कार्यालय, डहाणू, जि.पालघर, रा.डी/1, ओम दत्त को.ऑ.हा.सोसायटी, पारनाका, डहाणू गाव, ता.डहाणू, जि.पालघर यांनी माझेकडून 5,000/- रूपये लाचेची रक्कम उप अधीक्षक, भूमी अभिलेख कार्यालय, डहाणू, जि.पालघर येथे प्रवेषद्वाराजवळ पंचसाक्षीदार यांचे समक्ष स्विकारली तसेच सापळा कारवाई दरम्यान मी लोकसेवक प्रफुल्ल लक्ष्मण संखे, वय-54 वर्शे, पद-उप अधीक्षक (वर्ग-2), उप अधीक्षक, भूमी अभिलेख कार्यालय डहाणू, जि.पालघर, रा.
/202, मोहक हाऊस बिल्डींग, मनवेलपाडा रोड, मोरया नगर, विरार पूर्व, ता.वसई, जि.पालघर यांची भेट घेतली असता त्यांनी माझेकडे 25,000/-रूपये लाचेची मागणी करून सदर लाचेची रक्कम त्यांचे उप अधीक्षक, भूमी अभिलेख कार्यालय डहाणू येथील केबिनमध्ये पंचसाक्षीदार यांचे समक्ष स्विकारली असता दोन्ही आरोपीत लोकसेवक यांना दि.26/02/2024 रोजी 18.06 वाजताचे सुमारास ताब्यात घेण्यात आलेले आहे. म्हणून माझी त्यांच्याविरूध्द कायदेशिर फिर्याद आहे.

or (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.**
(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):
**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

14 **Signature/Thumb impression of the complainant / informant.**
(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

15. **Date and time of dispatch to the court**
(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

**Signature of Officer in charge, Police Station**
(ठाणे प्रभारी अधिकाऱ्याची स्वाक्षरी)

ठाणे अमलदार
डहाणू पोलीस ठाणे

**Name** (नाव): DATTATRAY BAJIRAC
**Rank**(पद): I (Inspector)
**No.**(सं.): PI